# दिव्याचा विकास हवा असेल तर यावेळी परिवर्तन घडवा-तुषार पाटील

दिवा न्यूज
दिशादर्शक, मार्गदर्शक!
वर्ष-४
अंक - ४९
epaper.diwanews.com
www.diwanews.com ♦ सोमवार,७ जुलै २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिवा शहर अध्यक्ष तुषार पाटील यांनी दिवा न्यूज ला विशेष मुलाखत दिली.यावेळी त्यांनी दिवा शहरातील मूलभूत प्रश्नांवर रोखठोक भाष्य करत सत्ताधाऱ्यावर दिशांना साधला... दिवा शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी यावेळी परिवर्तन आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले... (पान ३ वर)



# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची संकल्पना

# पातलीपाडा येथे दीड एकर क्षेत्रात सेंद्रिय शेती प्रकल्प सर्व नागरिकांसाठी झाला खुला

**ठाणे :-** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेला ठाणे महानगरपालिकेचा पातलीपाडा येथील सेंद्रिय शेती प्रकल्प कृषी दिनाच्या निमित्ताने सर्वसामान्य नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. महापालिकेच्या उद्यान विभाग आणि वृक्ष प्राधिकरणातर्फे या प्रकल्पाचे काम एप्रिल-२०२५मध्ये सुरू करण्यात आले होते. ठाणे महापालिकेतर्फे फेब्रुवारी महिन्यात आयोजित करण्यात आलेल्या वृक्षवल्ली प्रदर्शनाचे उद्घाटन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिकेने नागरिकांना आदर्श म्हणून सेंद्रिय शेती प्रकल्प करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागाने पातलीपाडा येथे सुमारे दीड एकर क्षेत्रात हा प्रकल्प विकसित केला आहे. या प्रकल्पाचे काम एप्रिल-२०२५ मध्ये सुरू झाले. महाराष्ट्र कृषी दिनाचे औचित्य साधून त्याचे अनौपचारिक लोकार्पण करण्यात आले. आता हा प्रकल्प सर्व नागरिकांसाठी खुला असल्याची माहिती उद्यान अधिक्षक केदार पाटील यांनी दिली. या प्रकल्पाचे पूर्ण व्यवस्थापन उद्यान विभागामार्फत करण्यात येत आहे. सेंद्रिय शेती प्रकल्पामुळे विद्यार्थी व नागरिकांना नैसर्गिक शेती, पिके, भाजीपाला, फळझाडे, सेंद्रिय खताचा वापर आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन यासंबंधी माहिती व प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. तसेच, शेतीचे महत्त्वही समजून घेता येईल, असेही पाटील यांनी सांगितले.

**प्रकल्पात काय?**

या प्रकल्पात, विविध प्रकारचा भाजीपाला व पालेभाज्यांची लागवड करण्यात आली आहे. त्यात, वांगी, भेंडी, टोमॅटो, मका, मिरची, ढोबळी मिरची, हिरवा व लाल कोबी, भुईमूग, रताळे, सुरण, लाल माठ, मेथी, कारले, दोडका, शिराळी, भोपळा अशा वेलवर्गीय भाज्या यांचा समावेश आहे. तसेच, दोन प्रकारचे तांदूळ व नाचणीचे उत्पादनही घेतले जात आहे. तर, फळझाडांमध्ये आंबा, लिंबू, चायनीज लिंबू, ॲवेकॅडो, अंजीर, केळी, सिताफळ, लक्ष्मणफळ, डाळिंब, बुटका नारळ आदी झाडांची लागवड करण्यात आली आहे. प्रकल्प क्षेत्रात कृत्रिम तलाव तयार करून त्यामध्ये वॉटर लिली व मासे सोडण्यात आले आहेत. भविष्यात या प्रकल्पामध्ये कोंबड्या, गाई, शेळ्या, टर्की व बदक पालन यांचा समावेश करण्याची योजना आहे.

**सेंद्रिय उत्पादने अनाथाश्रम व वृद्धाश्रमांना देणार** ठाणे महापालिकेच्या हा उपक्रम समजोपयोगी व्हावा यासाठी या शेतामध्ये तयार होणारी सेंद्रिय उत्पादने अनाथाश्रम व वृद्धाश्रम यांना देण्यात येणार आहे. पातलीपाडा सेंद्रिय शेती प्रकल्प हा सर्वार्थाने, पर्यावरणपूरक, शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा उपक्रम ठरणार असल्याचा विश्वास ठाणे महापालिकेच्या उद्यान विभाग व वृक्ष प्राधिकरणास आहे.



**नागरिकांसाठी खुले**


पातलीपाडा येथील महापालिकेच्या या सेंद्रिय शेती प्रकल्पास सोमवार ते शनिवार स. १० ते सायं. ५. या वेळेत नागरिकांना भेट देता येईल. शाळांना विद्यार्थी भेटींचेही आयोजन करता येणार आहे.

# दिव्यात एकाच रात्री चोरट्याने केली सात घरात चोरी

**दिवा:-** मागील काही दिवसांपासून दिवा शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून एकाच रात्रीत चोरट्यांनी सात घरात चोरी केल्याचे समोर आले आहे. चोरीच्या घटना वाढू लागल्याने दिव्यात पोलिसांची गस्त वाढवावी अशी आता मागणी होऊ लागली आहे. दिवा येथील ग्लोबल शाळेच्या परिसरात एकाच दिवशी रात्रीच्या वेळेस चोरट्याने तब्बल सात घरात चोरी केली.चोरी केलेल्या घरातून सोने-चांदी, रोख रक्कम आणि दहा मोबाईल फोन घेऊन चोरट्याने पोबारा केला आहे. चोरीच्या एका घटनेत चोरटा हाती लागण्यापूर्वीच किचन खिडकीच्या वाटे पळून गेल्याचे तक्रारीत म्हटले आहे.वाढत्या च्रोयांमुळे नागरिकांत भीतीचे वातावरण आहे. दिवा,पूर्व परिसरातील स्वामी समर्थ अपार्टमेंटमधील भावेश दैत यांनी दिलेल्या तक्रारीत, ते रविवारी (ता.२९) रात्री १ वाजण्याच्या सुमारास राहत्या घराचा दरवाजा बंद करून कुटुंबासह झोपी गेले. मध्यरात्री तीन वाजण्याच्या सुमारास त्यांची पत्नी अचानक ओरडली. त्यावेळी त्यांनी पत्नीला काय झाले असे विचारले,तोच त्याच्या घराच्या किचनच्या खिडकीचा आवाज आला. या आवाजाने उठून त्यांनी लाईट लावताच, एक अनोळखी २० ते २५ वर्षीय तरुण त्यांच्या घराच्या खिडकीतून पळून जात असताना दिसला. दरम्यान घरात पाहणी केली असता, त्या चोटच्याने त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्रासह घरातील सोने-चांदीचे दागिने, मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा ८८ हजार ५०० रुपयांचा ऐवज घेऊन पोबारा केला आहे. दरम्यान त्याच परिसरातील एकविरा अपार्टमेंट मधील सहा घरात चोरट्याने घरातील मंडळी झोपी गेले असताना घरात शिरकाव करून चोरी केली. त्या घटनेत दीपाली सिंग, प्रवीण हरावडे, सुशांत करवळ, सुजल मोहिते, दिलीप सावंत आणि तुलु पारूल शेख याच्या घरातून मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा सात घरातून एकूण १ लाख ७८ हजारांचा ऐवज चोरून नेल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी मुंब्रा पोलिस तपास करत आहेत.

# ठाणेकर जलतरणपटूंचा इंग्लंडमध्ये डंका

**ठाणे:-** वेगाने वाहणारा वारा.. अंधार.. समुद्राच्या लाटा अंगावर झेलत ठाणेकर जलतरणपटूंनी इंग्लंड ते फ्रान्स हे ४६ कि.मी.चे सागरी अंतर यशस्वीपणे पार करुन ठाण्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. मानव मोरे, आयुष तावडे व आयुषी आखाडे या जलतरणपटूंनी केलेल्या कौतुकास्पद कामगिरीबद्दल आज ठाण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी त्यांचा सन्मान करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.ठाणे महापालिकेच्या कै. मारोतराव शिंदे तरणतलाव येथे हे तिन्ही जलतरणपटू नियमित सराव करीत आहे. मानव मोरे, आयुष तावडे, आयुषी आखाडे या तिन्ही जलतरणपटूंनी इंग्लंड ते फ्रान्स हे सागरी अंतर भारताच्या प्राईड ऑफ इंडिया या संघात सहभागी होवून पार केले. हे दोन भारतीय संघ इंग्लंडमध्ये गेर्ले संघामध्ये ठाण्याच्या मानव राजेश मोरे वय वर्षे २० याची तरँ संघामध्ये आयुष प्रवीण तावडे वय वर्षे १५ व आयुषी कैलास आखाडे वय वर्षे १४ यांची निवड झाली होती. १६ जून २०२५ रोजी मधील जलतरणपटूंनी इंग्लीश खाडी पोहण्यास सुरूवात केली. या संघातील मानव



**इंग्लंड ते फ्रान्स हे सागरी अंतर पार करण्ग्या जलतरणपटूंचा खासदार नरेश म्हस्के यांनी केला सन्मान**

राजेश मोरे यांनी ४६ कि.मी.चे सागरी अंतर रिले पध्दतीने १३ तास ३७ मिनिटात पूर्ण केले. तर १८ जून रोजी च्या संघातील आयुष प्रवीण तावडे वय वर्षे १५ व आयुषी कैलास आखाडे वय वर्षे यांनी हे अंतर ११ तास १९ मिनिटात पूर्ण केले. या तिन्ही जलतरणपटूंचे आज खासदार नरेश म्हस्के यांनी कौतुक करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. हे तिन्ही जलतरणपटू इंग्लंडला जाण्यापूर्वी नियमित ठाणे महापालिकेच्या कै. मारोतराव शिंदे तरणतलाव येथे प्रशिक्षक कैलास आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली जलतरणाचा सराव करीत होते. तसेच इंग्लंड, फ्रान्स येथील वातावरणाचे तापमान लक्षात घेवून त्याची सवय व्हावी या दृष्टीने खाजगी तरणतलावात बर्फाच्या लाद्या टाकून जलतरणाचा सराव केला. अथक मेहनत आणि नियमित सराव यामुळेच हे यश प्राप्त केले असल्याचे तिन्ही जलतरणपटूंनी सांगितले. यावेळी त्यांचे पालक रुचिता मोरे, राजेश मोरे, प्रवीण तावडे, कैलास आखाडे उपस्थित होते.ती'च्या जिद्दीला सलाम आयुषी कैलास आखाडे या १४ वर्षीय जलतरणपटूला इंग्लंड येथे जाण्यापूर्वी पायाला दुखापत झाली होती. तिच्या पायाला ११ टाके पडल्यामुळे तिचा सराव पूर्णपणे बंद झाला होता. पायाची जखम जेमतेम भरली असल्याने तिला डॉक् ?टरनी पोहण्यास परवानगी दिली. तिने जिद्दीने हे सागरी अंतर ११ तास १९ मिनीटात पूर्ण केल्याने तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५

संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिव्याचा विकास हवा असेल,समस्या सुटाव्या असे वाटत असेल तर यावेळी परिवर्तन घडवा, तुषार पाटील यांचे जनतेला आवाहन

**“ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिवा शहर अध्यक्ष तुषार पाटील यांनी दिवा न्यूजचे संपादक सुहास खंडागळे यांना विशेष मुलाखत दिली.यावेळी त्यांनी दिवा शहरातील मूलभूत प्रश्नांवर रोखठोक भाष्य करत सत्ताधाऱ्यावर निशाणा साधला... दिवा शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी यावेळी परिवर्तन आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले...**



**प्रश्न**:-दिव्यात अधिकृत आणि अनधिकृत शाळा असा वाद सुरू आहे.या वादात विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकते.. याबाबत काय सांगाल ?

**तुषार पाटील**:-खरंतर अनधिकृत आणि अधिकृत शाळा असा वाद शिक्षणाच्या बाबतीत होणं दुर्दैवी आहे. अनधिकृत शाळा बंद होऊन त्यांचे विद्यार्थी अधिकृत शाळांना मिळावेत ही अधिकृत शाळांची भूमिका स्वार्थी आणि विद्यार्थी हिताच्या आड येणारी आहे.ज्या शाळांना परवानगी नाही त्यावर एकतर महापालिकेने कारवाई करावी किंवा त्यांना परवानगी देण्यासाठी पुढाकार घ्यावा. अनधिकृत शाळांमधून विद्यार्थ्यांना शिक्षण देणं हे विद्यार्थ्यांचे भविष्य खराब करण्यासारख आहे. मुळात महापालिकेने इतक्या वर्षात स्वत:चे शैक्षणिक धोरण दिव्यात सक्षमपणे राबवलं नाही. ही वस्तुस्थिती जी अलीकडे समोर आली आहे, ती भयानक आहे. महापालिकेत सत्ताधारी असणऱ्या लोकांनी दिव्यात शैक्षणिक सोयी सुविधा पुरवल्या नाहीत आणि यातूनच दिव्यात शिक्षणाचा प्रश्न आता निर्माण झाला आहे. लोकसंख्या वाढल्याने वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात येथे शिक्षण सुविधा नाहीत ही वस्तुस्थिती आहे. महापालिका प्रशासनाने धोरणात्मक दृष्टिकोनातून याकडे पाहिले पाहिजे आणि दिवा शहरात जी महापालिका शाळा वाढवण्याची मागणी होऊ लागली आहे त्या दृष्टीने ठोस उपाययोजना करायला हव्यात. ज्यांनी दिव्यात शैक्षणिक असुविधा निर्माण केल्या तेच मेळावे आणि आंदोलने करणार असतील तर सत्तेत राहून तुम्ही इतके दिवस काय केलं ? हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो.

**प्रश्न**:-दिवा शहरातील फेरीवाल्यांविरोधात सर्वजण आवाज उठवतात... तरीही फेरीवाले हटवले जात नाहीत...

**तुषार पाटील**:-महापालिकेचा जर आशीर्वाद फेरीवाल्यांना असेल तर फेरीवाले कसे हटवले जातील ?दिव्यातील रस्ते मोकळे व्हावेत ही मुळात पालिका प्रशासनाची इच्छा नाही. महापालिका प्रशासनाला वारंवार मनसेच्या माध्यमातून आम्ही सांगूनही दिवा शहरातील रस्ते मोकळे करण्यात महापालिका प्रशासन, सहाय्यक आयुक्त अपयशी ठरत आहेत. यांना दिवा शहराच्या नियोजनाशी काही देणंघेणं नाही. दिवा शहराचा या लोकांनी बाजार मांडलेला आहे.मनसेमुळे स्टेशन परिसरातील फेरीवाले काही काळ हटवले गेले, मात्र या लोकांना आर्थिक हितसंबंधातून रस्त्याच्या दुतर्फा बसवले जाते आणि सर्वसामान्य दिवेकरांना मात्र याचा त्रास होतो.वाहतूक कोंडी होते. चालण्यासाठी रस्ते नाहीत. किमान महत्त्वाचे रस्ते तरी मोकळे सोडायला हवेत. मात्र महापालिकेचे अधिकारी आणि फेरीवाल्यांकडून चिरीमिरी घेणारे यांच्या स्वार्थी भूमिकेमुळे दिवावासियांचे नुकसान होत आहे.

**प्रश्न**:-दिवा म्हटलं आरोग्य समस्या आलीच...आरोग्याचा विषय न सुटण्याचे कारण काय ?

**तुषार पाटील**:-हे तुम्ही पालिका आयुक्तांना विचारायला हवे. दिव्यातील नागरिकांसाठी एक रुग्णालय महापालिका देऊ शकत नसेल तर अशी महापालिका दिव्याला हवी कशाला ?आरोग्य समस्या आहे, पाणी समस्या आहे हे प्रश्न इतक्या वर्षात सुटले नाहीत. याला इच्छाशक्तीचा अभाव हे कारण आहे.तुम्ही ज्या लोकांना आरोग्य, शिक्षण, रोजगार यातल्या गोष्टी कळतच नसतील, असे लोक निवडून देत असाल तर दिव्यातील प्रश्न सुटणार कसे ? आरोग्याच्या प्रश्नावर सांगायचं झालं... तर दिव्यात एक साधारण हॉस्पिटल नाही. साधे क्लिनिक उघडून महापालिका दिव्यातील आरोग्य सुविधा देत असल्याचा जो आव आणत आहे, तो चुकीचा आहे. तुम्ही ओपीडी चालू केले आहेत. परंतु येथील रुग्णांना ओपीडीची नाही तर हॉस्पिटलची गरज आहे. तुम्ही दिवा शहरासाठी हॉस्पिटल कधी सुरू करणार आहात ? हा प्रश्न आहे. दिव्यात तुम्ही एखादी भाड्याची जागा घेऊन सुद्धा हॉस्पिटल सुरू करू शकता. परंतु हॉस्पिटल सुरू करायचं नाही आणि फक्त ओपीडी सुरू करायच्या यातून तुम्ही दिव्यातील जनतेच्या आरोग्याबाबत किती गंभीर आहात हे कळते.

**प्रश्न**:-दिव्यातील नागरिकांसाठी वाहतूक समस्येच्या दृष्टीने काय उपाययोजना असायला हव्यात ?

**तुषार पाटील**:-वाहतूक कोंडी हा येणऱ्या काळात दिव्यात गंभीर प्रश्न म्हणून निर्माण होणार आहे.याकडे पाहायचं झालं तर यावर आताच उपाय योजना होणे गरजेचे आहे.त्यासाठी दिवा शहरातील रस्ते पहिल्यांदा मोकळे करायला हवेत. फेरीवाल्यांना अन्य ठिकाणी जागा द्यायला हवी.रस्ते लहान आहेत.दिवा शहरात अंतर्गत सार्वजनिक प्रवासाच्या दृष्टीने मिनी बस महापालिकेने सुरू करायला हव्यात. मोठ्या बस दिवा शहरात आत मध्ये फिरू लागल्यास ट्रॅफिकचा प्रश्न निर्माण होईल.गर्दीच्या वेळी अवजड वाहनांना शहरात बंदी हवी. बस स्थानक हे दिवा शहराच्या बाहेरच असायला हवं.मीनी बस सुरू झाल्यास त्याचा सर्वाधिक फायदा दिवा शहरातील सर्वसामान्य नागरिकांना होईल. महापालिकेने त्या दृष्टीने विचार करायला हवा.

**प्रश्न**:-दिवा लोकल सुरू होण्याची मागणी होते... ?

**तुषार पाटील**:- सत्ताधाऱ्यांनीच ती मागणी करून काय फायदा ? जे सत्तेत आहेत ते मागील दहा वर्षापासून फक्त मागणीच करत आहेत.मुळात त्यांनी निर्णय घ्यायला हवा.दिवा लोकल सुरू करायला हवी. जे लोक सत्तेमध्ये बसले आहेत,त्यांनी घाटकोपर प्रमाणे दिव्यातून लोकल सुरू करण्यासाठी आग्रह करायला हवा. किती दिवस तुम्ही जनतेला आश्वासन देणार आहात... तुम्हीच सत्तेत राहणार... तुम्हीच मागण्या करणार आणि तुमच्याच मागण्या पूर्ण होणार नसतील तर तुम्ही सत्तेत राहता कशाला ?जनतेने सुद्धा या गोष्टी आता लक्षात घ्यायला हव्यात. दिव्यात मागील दहा वर्षात किती अपघात झाले आहेत.लोकांची मागणी असतानासुद्धा दिवा लोकल सुरू होत नसेल तर याला जबाबदार सत्ताधारी आहेत.

**प्रश्न**:-आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टिकोनातून दिवावासीयांना काय आवाहन कराल ?

**तुषार पाटील**:-कोणत्याही आमिषाला बळी न पडता यावेळी मतदान करा.प्रत्येक वेळेला मतदान करता आणि तुमचे प्रश्न तसेच राहतात. प्रश्न न सोडवणारे लोक जर तुम्ही निवडून दिलेत तर ते तुम्हाला गृहीतच धरणार. मुळात दिव्यातील समस्या न सुटण्याला जसे काम न करणारे लोकप्रतिनिधी कारणीभूत आहेत, तसे काम न करणाऱ्या लोकांना निवडून देणारे लोकही तितकेच जबाबदार आहेत. परिणामी दिवा शहरातील जनतेने यावेळी परिवर्तन घडवायला हवं. जोपर्यंत दिव्यामध्ये विरोधी पक्षांचा आवाज बळकट होत नाही तोपर्यंत इथल्या समस्या सुटणार नाहीत,ही गोष्ट ही जनतेने लक्षात घ्यायला हवी. मनमानी कारभाराला जर आळा घालायचा असेल आणि नियोजन पद्धतीने दिवा शहराचा विकास करायचा असेल तर यावेळी जनतेने निर्धार करायला हवा परिवर्तन करायला हवे.

# जनते मधील नेता...







मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विचारांवर चालणारा नेता अशी तुषार पाटील यांची दिवा शहरात ओळख आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची ध्येयधोरणे आणि विचार दिवा शहरात रुजवण्याचा,वाढविण्याचा प्रयत्न तुषार पाटील यांच्याकडून मागील काही वर्षांपासून झालेला आहे. सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांची फळी त्यांच्या पाठीशी आहे.सर्वसामान्य जनतेचे प्रश्न समजून घेऊन लोकांमध्येच राहणारा आणि वावरणारा नेता अशी तुषार पाटील यांची ओळख आहे. दिवा शहरातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्याची तळमळ तुषार पाटील यांच्याकडे आहे. अभ्यासपूर्ण विषयाची मांडणी यामुळे अधिकाऱ्यांमध्येही त्यांचा वचक आहे.









# दिव्यातील RTE प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना शाळेने पाठ्यपुस्तके देण्याचे शिक्षण विभागाचे परिपत्रक; मनसे पदाधिकाऱ्यांनी घेतली शिक्षण अधिकाऱ्यांची भेट



**दिवा:**-दिव्यातील RTE मधून प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांना दिव्यातील शाळांकडून पाठ्यपुस्तके देण्यात येत नाहीत. एस.एम.जी शाळेकडून इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्याचा कुठलाही शासनाचा आदेश नाही असे सांगण्यात आले होते. संबंधित नियमांची स्पष्टता पडताळून तसे परिपत्रक शाळांना काढण्यासाठी मनसेकडून शिक्षण अधिकाऱ्यांना ईमेल करण्यात आला होता. दिव्यातील एस. एम जी शाळेच्या पालकांसोबत मनसेच्या शिष्टमंडळाने आज ठामपाच्या शिक्षण अधिकाऱ्यांची भेट घेऊन दिव्यातील सर्व शाळांमधील RTE पात्र विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यासंदर्भात चर्चा केली. ज्या शाळा RTE च्या मोफत पुस्तके देत नसेल त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणीही मनसे कडून करण्यात आली. शिक्षण विभागाने त्यासंदर्भात आज परिपत्रक जारी केले असून आठ दिवसात विद्यार्थ्यांना पुस्तके मिळतील असे आश्वासन शिक्षण अधिकाऱ्यांनी दिले आहेत. यावेळी सदर बैठकीत पालक, दिवा शहर आणि ठाणे शहर मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते



# जूनच्या पगारासोबत मिळाले प्रवास भत्त्याचे ६० हजार!

## ठाणे महापालिकेच्या पाच हजार कर्मचाऱ्यांना दिलासा
## आमदार संजय केळकर यांच्या बैठकीचे फलित

**ठाणे:-** ठाणे महापालिका कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांबाबत आमदार संजय केळकर यांनी महापालिकेत घेतलेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत केलेल्या चर्चेनुसार अनेक समस्या मार्गी लागल्या असून सुमारे साडेपाच हजार कर्मचाऱ्यांना जूनच्या पगारासोबत प्रत्येकी ६० हजार रुपये वाहतूक भत्त्याचा फरक मिळाल्याने आनंदाचे वातावरण आहे.

२ जानेवारी २०२५ रोजी स्थायी समिती सभागृहात झालेल्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी, उपायुक्त (मुख्यालय) जी.जी. गोदेपुरे, उपायुक्त (आरोग्य विभाग) उमेश बिरारी, उपायुक्त (सुरक्षा विभाग) सचिन सांगळे आणि कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप उपस्थित होते.

या बैठकीत आमदार संजय केळकर यांनी महापालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रवास भत्त्याची फरकाची रक्कम अदा करण्याबाबत सूचना केल्या होत्या. यावर संबंधित अधिकाऱ्यांनी निधीच्या उपलब्धतेनुसार भत्त्याचा फरक देण्याची कार्यवाही सुरू करण्यात येईल, असे सांगितले होते. याबाबत श्री.केळकर यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर जून महिन्याच्या पगारासोबत अधिकारी कर्मचाऱ्यांना फरकाची रक्कमही देण्यात आली. सुमारे साडेपाच हजार कर्मचाऱ्यांना प्रत्येकी ६० हजाराची रक्कम मिळाल्याने पालिका वर्तुळात उत्साहाचे वातावरण झाले आहे. वाहतूक भत्त्याचा फरक, सातव्या वेतन आयोगाचा पहिला, दुसरा आणि तिसऱ्या हप्त्याचा फरक, तसेच २०१६ नंतरच्या कर्मचाऱ्यांचा सातव्या वेतन आयोगाच्या फरकाचे हप्ते, पाच वर्षे रखडलेली ड-वर्ग पदोन्नती, पीएफ डीसीपीएसच्या पावत्या देणे, १०,२०,३० वर्षे सेवा झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना आश्वासीत प्रगती योजना लागू करणे, वारसा अनुकंपांच्या नियुक्ती देणे, ए. एन. एम. प्रसाविका पदाची पदोन्नती तसेच वेतन त्रुटी, कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणे, या व अशा अनेक प्रश्नांवर बैठकीत चर्चा करण्यात येऊन श्री. केळकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. श्री. केळकर यांनी बैठकीनंतर देखील या प्रश्नांची तड लावण्यासाठी पाठपुरावा सुरू ठेवल्याने या सूचनांची अंमलबजावणी टप्प्या टप्प्याने होत असल्याने कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# आषाढी एकादशीला प्रवासी सेवेसाठी येणाऱ्या सर्व एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन व्यवस्था

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई :-** आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५२०० बसेसची व्यवस्था केली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी व या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात त्यांच्या जेवणाची आबाळ होऊ नये, म्हणून यंदा स्वखर्चाने मी सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत आहे. या निमित्ताने माणसातील ठ विठुरायाठ ची सेवा करण्याची संधी मला मिळत आहे.



अर्थात, हे पुण्य पैशात मोजण्यासारखे नाही. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम मी राबवणार आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले. आषाढी वारीच्या काळात ५,६ व ७ जुलै रोजी चंद्रभागा बसस्थानक, भिमा बसस्थानक, विठ्ठल बसस्थानक व पांडुरंग बसस्थानक येथे सुमारे १३ हजार एसटी कर्मचारी या मोफत भोजन व्यवस्थेचा लाभ घेतील.

# श्री माँ विद्यालयात फोर स्टार रँकिंग टेबल टेनिस स्पर्धा



**ठाणे :-** श्री माँ विद्यालय, घोडबंदर रोड श्री माँ हॉल मध्ये फोर स्टार रँकिंग टेबल टेनिस स्पर्धा नुकतीच यशस्वीरित्या पार पडली. श्री माँ गुरुकुल आणि ॲस्पायरंटस् टेबल टेनिस ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ठाणे, मुंबई शहर, पालघर आणि रायगड जिल्ह्यांतील विविध वयोगटांतील ५३० हून अधिक टेबल टेनिस खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. सहा दिवसांच्या या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल श्री माँ गुरुकुल आणि ॲस्पायरंटस् टेबल टेनिस ॲकॅडमीचे सर्वांनी कौतुक केले. पालक, प्रशिक्षक आणि प्रेक्षकांनी स्पर्धक खेळाडूंना टाळ्या वाजवून दिलेल्या प्रोत्साहनामुळे वातावरण भारावून गेले होते. बक्षीस वितरण समारंभाने या भव्यदिव्य स्पर्धेची सांगता झाली. स्पर्धेत १३ वर्षांखालील मुलींमध्ये जिनया वधान ही प्रथम क्रमांकाची विजेती ठरली. ज्ञानश्री तरडे हिला द्वीतीय क्रमांक मिळाला ११ वर्षाखालील मुलांमध्ये युवानसिंह वालिया व अव्यानसिंह वालिया यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. मुलींमध्ये साईशा मधूर व देवेशी गावडे तर मुलांमध्ये अधिराज चौहान व श्रेयन मिश्रा यांना उपांत्य विजेतेपद मिळाले. या स्पर्धेला श्री माँ ग्रुप ऑफ इन्स्टीट्यूशन्स्चे चेअरमन श्री बालगोपाल, श्री माँ विद्यालयाच्या प्रिन्सिपॉल मिनी नायर, वाईस प्रिन्सिपॉल मेघना वांगे, हेड मिनिस्टेट रमा अनंतरामन, लक्ष्मी अय्यर तसेच टी.डि.टि.टि.ऐ आणि एम.एस.टि,टि.ए चे सेक्रेटरी यतीन टिपणीस यांची उपस्थिती लाभली.

# मनसेमुळे अखेर अनेक वर्षांनी केंद्रीय विद्यालयात मराठी शिकवली जाणार

## राज्यातील केंद्रीय विद्यालयाच्या ६९ शाळांमध्ये ठाणे पॅटर्न राबवावा




**ठाणे :-** राज्यभाषा मराठीला न्याय मिळावा यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पुन्हा एकदा यशस्वी लढा दिला आहे. ठाण्यातील कोलशेत येथील केंद्रीय विद्यालयात मराठी भाषा शिकवण्याचा निर्णय अखेर घेण्यात आला असून, मनसेच्या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या शाळेत मराठी शिकवली जात नव्हती, याबाबत मनविसेचे सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी शिक्षणाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती.

ठाण्यातील कोलशेत येथील केंद्रीय विद्यालयात १४०० विद्यार्थी शिक्षण घेत असून, हिंदी आणि इंग्रजी या दोनच भाषांमध्ये शिक्षण दिले जात असल्याने मराठी भाषेचा समावेश करण्यात यावा, अशी ठाम मागणी पाचंगे यांनी केली होती. मराठी ही राज्याची अभिजात दर्जा प्राप्त भाषा असून तिचा अवमान केल्यास भविष्यात मराठी संस्कृती आणि भाषेबाबतची जाण कमी होण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. महाराष्ट्रातील ६९ केंद्रीय विद्यालयांत ८५ हजार ४९७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यापैकी अनेक शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसल्याने विद्यार्थ्यांवर त्याचा परिणाम होत होता. या पाठपुराव्याला अखेर यश आलं असून, २६ जून २०२५ रोजी केंद्रीय विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी शिक्षणाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात मराठी शिकवण्यास सहमती दर्शवली आहे. 'नवीन शैक्षणिक धोरणानुसार मराठी भाषा ही स्थानिक भाषा म्हणून शिकवणे आवश्यक असून, आमच्या शाळेत सुद्धा याची अंमलबजावणी होईल असे मुख्याध्यापकांनी लेखी कळवले आहे.

दरम्यान सध्या राज्यात हिंदी भाषेवरून सुरू असलेल्या वादामुळे राज्य सरकारने राज्यात हिंदी सक्ती नसून मराठी सक्ती असल्याचे आदेश दिले असले तरी आजही अनेक शाळांमध्ये मराठी शिकविली जात नाही हे वास्तव आहे.

या निर्णयामुळे ठाणे पॅटर्न राज्यातील इतर केंद्रीय विद्यालयात राबविला जावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. स्थानिक स्तरावर भाषेची जपणूक आणि विद्यार्थ्यांचा समविकास होण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरेल. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतरही अद्याप अनेक शाळांमध्ये तिच्या अध्यापनाबाबत दुर्लक्ष होत होते. मात्र मनसेच्या वेळेवर झालेल्या हस्तक्षेपामुळे ठाण्यातून सुरुवात झाली असून, लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात केंद्रीय शाळांमध्ये मराठी शिकवली जावी, अशी मागणी केली जात आहे.

शाळेत मराठी भाषा शिकवली जात नाही अशी तक्रार पालकांनी मनविसे कडे केल्यानंतर ठाण्यातील केंद्रीय विद्यालयाच्या मुख्याध्यापकांची भेटून मराठी विषय शिकवणे बंधनकारक असल्याचे सांगितले. शिक्षणाधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतर आता शाळा मराठी विषय पहिली पासून शिकवणार आहे. मुख्यमंत्री सांगतात तशी मराठीची सक्ती सर्व बोर्डाच्या शाळांमध्ये अंमलात आलेली नाही. महाराष्ट्रातील ६९ केंद्रीय विद्यालयांच्या शाळांमध्ये ८५४९७ मुले मराठी शिकत नाहीत त्यांना देखील मराठी शिकवले गेलेच पाहिजे. **-संदीप पाचंगे, सरचिटणीस मनविसे**


महाराष्ट्र नवनिर्माण सेना
दिवा शहर अध्यक्ष
श्री.तुषार
पाटील साहेब
आपणास
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
-:शुभेच्छुक:-
प्रकाश पाटील,विभाग प्रमुख